# <u>प्रेसनोट</u>

दि. ०३/०४/२०२३

सजा – चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील तलाठी व त्यांच्या मदतनीसावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३४ वर्षे |
| आरोपी, नाव व कार्यालय | १) लोकसेवक निलम मानसिंग देशमुख, वय ३२ वर्ष, तलाठी, सजा - चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे.<br>२) नारायण दत्तात्रय शेंडकर, वय ५० वर्ष (खाजगी इसम). |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ०३/०४/२०२३ |
| सापळा दिनांक | ०३/०४/२०२३ |

ठिकाण :- तलाठी कार्यालय चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची आई जानेवारी २०२३ मध्ये मयत झालेने त्यांचे ७/१२ उता-यावरुन नाव कमी करण्यासाठी चांबळी येथील तलाठी कार्यालयात अर्ज केला होता. ७/१२ उता-यावरील नाव कमी करण्यासाठी तलाठी कार्यालयामध्ये २,०००/- रुपयाची (दोन हजार रुपये) लाच मागणी झाल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक तलाठी निलम देशमुख यानी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली व त्यांचे मदतनीस खाजगी इसम नारायण शेंडकर यानी लाच मागणी करून लोकसेवक देशमुख यांचेकरीता २,०००/- रुपये लाच रक्कम स्वीकारली.

दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक ज्योती पाटील तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.